# वाणिज्य विभाग

# २०१८-१९

## कार्यक्रम

| अ.क्र. | दिनांक | कार्यक्रम | व्याख्याते |
|---|---|---|---|
| १ | ११/०७/२०१८ | शेअर बाजार व परस्पर निधी मार्गदर्शन | प्रा. चेतन खांडेकर |
| २ | १२/०७/२०१८ | स्पर्धा परिक्षेंची तयारी | सौ. स्नेहा निमूनकर |
| ३ | १३/०७/२०१८ | उद्योजक आपल्या भेटीला | श्री. संतोष शिर्के |
| ४ | ११/०८/२०१८ | देशाच्या विकासासाठी जी.एस.टी. अनिवार्य | श्री. सुशिल अवेरे |
| ५ | २८/०९/२०१८ | ग्राहक संरक्षण एक काळाची गरज | श्री. एस.एम.जोशी |
| ६ | १५/०३/२०१९ | जैवविविध उद्यानाला भेट | श्री. राम रेडीज |

# महाराष्ट्रीय जनतेने शेअर्स बाजाराच्या पर्यायाचा जाणीवपुर्वक विचार करावा. - प्रा. खांडेकर चेतन

पाटपन्हाळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वाणिज्य मंडळातर्फे मंगळवार दि. ११ जुलै २०१८ रोजी शेअर्स बाजार व म्युच्यूअल फंड या संदर्भात प्रा. चेतन खांडेकर, डिबीजे महाविद्यालय, यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये शेअर्स म्हणजे नेमके काय, त्याची सुरूवात कधीपासून व कशी झाली, सद्याच्या युगामध्ये त्याचे स्वरूप कसे असते याची प्रथमत: माहिती दिली. सर्वसाधारणत: महाराष्ट्रातील जनता कोणतीही गुंतवणूक करतांना सर्वप्रथम ती सुरक्षीत कशी राहील याचाच जास्त विचार करतात. यामुळे ज्या ठिकाणी धोका खुपच कमी असतो अशाच ठिकाणी म्हणजे बँका, पोस्ट ऑफिस, सोने, स्थावर मालमत्ता यांच्यामध्येच गुंतवणूक करतात. या गुंतवणूकीतून त्यांना फारसा परतावा मिळत नाही. सद्याच्या शेअर्स बाजाराचा अभ्यासपुर्वक विचार केल्यास व त्यानुसार गुंतवणूक केली तर ती सुरक्षीतही राहते व परतावाही जास्त मिळतो. यासाठी बाजारपेठेतील परिस्थितीचा सातत्याने अंदाज घेऊन थोडीशी सहनशक्ती ठेवल्यास मोठ्या प्रमाणात शेअर्स गुंतवणूकीतून उत्पन्न मिळू शकते हे त्यांनी विविध उदाहरणांच्या आधारे स्पष्ट केले. मुंबई शेअर बाजारामध्ये ८०टक्के गुंतवणूकदार हे बिगर महाराष्ट्रीयन आहेत. या गुंतवणूकीच्या आधारे त्यांनी आपला आर्थिक स्तर मोठ्या प्रमाणात उंचावला आहे. महाराष्ट्रीयन व्यक्तीने धोका पत्करून शेअर्समध्ये गुंतवणूक केल्यास त्यांचादेखील आर्थिक स्तर कसा उंचावू शकतो हे त्यांनी विविध उदाहरणांच्या आधारे स्पष्ट केले. धोका पत्करणे शक्य नसेल तर म्यूच्यूअल फंडाचा देखील चांगला पर्याय लोकांच्या समोर उपलब्ध आहे. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी केवळ थेअरीचाच विचार न करता अभ्यासाबराबरच प्रत्यक्षातील शेअर बाजाराचा अभ्यास केल्यास त्यांनादेखील भविष्यात मोठ्या प्रमाणात उत्पन्नाची संधी मिळू शकते हे स्पष्ट केले. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कुमारी शामली भोबस्कर, प्रस्तावना कुमारी सुमय्या बोधले व आभार प्रदर्शन प्रणव आडविलकर याने केले. सदर कार्यक्रमाला पाटपन्हाळे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य श्री. प्रवीण सनये, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. सुभाष खोत, प्रा. लंकेश गजभिये व प्रा. क्रिष्णाजी शिंधे हे उपस्थित होते.







पाटपन्हाळे एज्युकेशन सोसायटीचे
पाटपन्हाळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
Use of Mobile Phone is Strictly Prohibited
RINCIPAL'S OFFICE




# कोकणातील स्पर्धा परिक्षेसाठी टक्का वाढविणे आवश्यक आवश्यक सौ स्नेहा निमुणकर

गुरूवार दि. १२ जुलै. २०१८ रोजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पाटपन्हाळे येथे महाविद्यालयाच्या स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कक्षातर्फे 'स्पर्धा परिक्षांची तयारी' या विषयावर यशोगाथा अभ्यास मंडळाच्या सौ स्नेहा निमुणकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य मा. प्रविण सनये यांनी भुषविले. आपल्या मार्गदर्शनामध्ये सौ स्नेहा निमुणकर यांनी अलीकडील काळात यश मिळविलेल्या स्पर्धा परिक्षेतील विदयार्थ्यांची यशाची पार्श्वभुमी स्पष्ट केली. दहावी व बारावी परिक्षेत कोकण कायम अग्रेसर असताना स्पर्धा परिक्षेत अत्यंत मागे आहे अशी खंत त्यानी बोलून दाखविली. अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असतांना देखील सर्वसामान्य विद्यार्थी या परिक्षेत नियोजनबध्द व सातत्यपुर्ण प्रयत्न केल्यास यश मिळवू शकतो असे स्पष्ट केले. केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत भरली जाणारी विविध पदे प्रामुख्याने भारतीय प्रशासकिय सेवा, भारतीय पोलिस सेवा, भारतीय परकीय सेवा, उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी, नायब तहसिलदार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षण अधिकारी, लिपीक, कनिष्ठ न्यायाधिश, पोलिस उपनिरिक्षक, क्रिडा अधिकारी इ. पदांची असणारी जाहिरात, त्यासाठी आवश्यक किमान पात्रता, अर्ज करण्याची पध्दत याबद्दल सविस्तर माहिती दिली. पोलिस उपनिरिक्षक तसेच राज्यसेवा परिक्षेतील पुर्व परिक्षा, मुख्य परिक्षा तसेच मुलाखत या तीन टप्प्यांना कसे सामोरे जावे, त्याचबरोबर महाविद्यालयीन जीवनापासूनच या तिन्ही टप्प्यांचा कसा अभ्यास करावा की जेणेकरून या स्पर्धेला सहज सामोरे जाता येईल याचे विवेचन केले. अभ्यास करतांना येणा-या सर्व प्रतिकूल परिस्थितीवर मात करून स्पर्धा परिक्षांना सामोरे जावे असे आवाहन केले. या स्पर्धा परिक्षांना सामोरे जातांना मागील काळातील प्रश्नपत्रिका, वर्तमान पत्रांचे वाचन, इंग्रजी विषयाची तयारी, गट चर्चा तसेच व्यक्तिमत्व विकासाच्या अनुषंगाने आवश्यक असणारा प्रामाणिकपणा, विनम्रता, शिष्टाचार, औपचारिकपणा इ. मुळे कशा रितीने या परिक्षांना फायदा होतो हे स्पष्ट केले. या परिक्षांच्या तयारीबाबत विद्यार्थ्यांचे वेळापत्रक, संदर्भ ग्रंथाचे वाचन, वेळेचा सदुपयोग कसा करावा हे स्पष्ट केले. आगामी काही महिन्यात महाराष्ट्र सरकारकडून विविध प्रकारची ३६००० पदे भरली जाणार आहेत त्याची तयारी देखील विदयार्थ्यांनी करावी असे आवाहन केले.सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.देसाई पी ए यानी व आभार प्रदर्शन प्रा. खोत एस.एस. यांनी केले. या कार्यक्रमाला प्रा. गजभिये, प्रा. भागवत पी एस, शिदे के आर, पारखे डी वाय व महाविदयालयातील सर्व विद्यार्थि उपस्थित होते.


पाटपन्हाळे एज्युकेशन सोसायटीचे,
दिनांक - १२ जुलै २०१८
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
आयोजित.
स्पर्धा परिक्षांची तयारी.
अभ्यास मंडळ.



# संघर्ष हा उद्योजकतेचा पाया असतो - श्री. संतोष शिर्के

शुक्रवार दि. १३ जुलै, २०१८ रोजी पाटपन्हाळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वाणिज्य मंडळाच्या वतीने उद्योजक आपल्या भेटीला या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला मार्गदर्शन करण्यासाठी चिपळूण तालुक्यातील उद्योजक व शाही मसाला उद्योगसमुहाचे मालक श्री. संतोष शिर्के उपस्थित होते. या कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना श्री. शिर्के यांनी विद्यार्थ्यांनी भविष्यामध्ये नोकरीचा विचार न करता उद्योजकतेचा विचार केल्यास त्यांना चांगले यश मिळू शकते हे स्पष्ट केले. रत्नागिरी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांकडे विविध चांगल्या गुणवत्ता असून देखील ते उद्योजकतेकडे फारसे लक्ष देत नाहीत. उद्योजकतेमध्ये यशस्वी होण्यासाठी संघर्ष हा उद्योजकतेचा पाया असतो. उद्योगामध्ये विविध अडचणी असल्यामुळे त्यावर मात करण्याऐवजी त्यापासून पलायन करण्याचाच मार्ग स्विकारला जातो. सहनशिलता, आत्मविश्वास व उच्च ध्येय्य असेल तर उद्योजकतेमध्ये उंच भरारी घेता येऊ शकते. रत्नागिरी जिल्ह्यातील अनेक उद्योजक आपली आर्थिक परिस्थिती नसतांना देखील संघर्षाच्या जोरावर ते कसे घडले हे विविध उदाहरणांच्या आधारे स्पष्ट केले. सुरूवातीला व्यवसाय कसा निवडावा व त्यातील संधी कशाप्रकारे शोधावी याचे सविस्तर विवेचन केले. विद्यार्थी दशेमध्ये असतांना उद्योजकतेचा शोध घेतल्यास भविष्यात मोठे यशस्वी उद्योजक होता येईल हे विविध उदाहरणांद्वारे स्पष्ट केले. कोकणातील बहुतेक विद्यार्थ्यांकडे गुणवत्ता भरपूर प्रमाणात आहे, त्याचा वापर महाविद्यालयीन जिवनापासून केल्यास व केवळ नोकरीच्या मागे न लागता व्यवसायात आवडीने काम केल्यास मोठे उद्योजक घडू शकतात असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कुमारी जानव्ही शिरगावकर, प्रस्तावना कुमारी राहिनी जाधवे व आभार प्रदर्शन ऋषिकेश जोशी याने केले. सदर कार्यक्रमाला पाटपन्हाळे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य श्री. प्रवीण सनये, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. सुभाष खोत, प्रा. लंकेश गजभिये व प्रा. क्रिष्णाजी शिंधे हे उपस्थित होते.





# देशाच्या विकासासाठी जी.एस.टी. अनिवार्य - श्री. सुशिल अवेरे

शनिवार दि. ११ ऑगष्ट, २०१८ रोजी पाटपन्हाळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वाणिज्य मंडळाच्या वतीने जीएसटी समज व गैरसमज या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला मार्गदर्शन करण्यासाठी रत्नागिरी जिल्ह्यातील शासन मान्यताप्राप्त कर सल्लागार श्री. सुशिल अवेरे उपस्थित होते. या कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना श्री. अवेरे यांनी सर्वप्रथम कर ही संकल्पना स्पष्ट केली. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर कसे असतात व त्याचा उपयोग सरकारकडून कसा केला जातो हे स्पष्ट केले. १ जुलै २०१७ पासून जीएसटीची अमलबजावणी सरकारने सुरू केली. जीएसटीची अमलबजावणी करीत असतांना सरकारचे उदेश्य काय होते हे स्पष्ट केले. तसेच राज्य व केंद्रामध्ये असणारे कोणकोणते विविध कर यामध्ये आणले हे स्पष्ट केले. प्रामुख्याने १४ अप्रत्यक्ष कर बंद करून जीएसटी हा एकच कर लागू केला. पुर्वीच्या करामध्ये मोठ्या प्रमाणात विविध राज्यांमध्ये विविधता होती. तसेच उत्पादक व व्यापाऱ्यांनादेखील मोठ्या प्रमाणात तांत्रीक अडचणींना सामोरे जावे लागत होते. यावर पर्याय म्हणून एक देश एक कर या संकल्पनेतून जीएसटी लागू करण्यात आली. जीएसटी संदर्भात अजूनही पुरेशी जागृती व्यापारी, उत्पादक व ग्राहकांमध्ये दिसून येत नाही. कोणकोणत्या वस्तूंवर जीएसटी लागू करण्यात आलेली आहे व कोणकोणत्या वस्तूवर लागू करण्यात आलेली नाही याची माहिती त्यांनी विविध वस्तू व सेवांचे उदाहरणे देऊन सांगितले. जीएसटीचे वेगवेगळे असणारे दर व त्याचा केंद्र व राज्याशी असणारा उत्पन्नाचा वाटा याची माहिती दिली. कोणासाठी जीएसटी बंधनकारक आहे व कोणाला त्यातून वगळले आहे याची माहिती देऊन जीएसटी नोंदणीसाठी कोणकोणत्या बांबी आवश्यक आहेत हे स्पष्ट केले. जीएसटी संदर्भात अजूनही शासकीय पातळीवर सुधारणा सुरू असून त्या काही दिवस सुरूच राहतील. यात जीएसटीमुळे सरकारच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. त्याच्या फायदा सरकारला सार्वजनिक हितासाठी होऊ शकतो व पर्यायाने देश विकसीत होण्यासाठी हातभार लागू शकते. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कुमारी कोमल सकपाळ, प्रस्तावना कुमारी जानव्ही शिरगावकर व आभार प्रदर्शन संकेत चव्हाण याने केले. सदर कार्यक्रमाला पाटपन्हाळे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य श्री. प्रवीण सनये, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. सुभाष खोत, प्रा. लंकेश गजभिये व प्रा. क्रिष्णाजी शिंधे हे उपस्थित होते. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.



# ग्राहक संरक्षण एक काळाची गरज

श्री. एस.एम.जोशी

शुक्रवार दि. २८ सप्टेंबर २०१८ रोजी पाटपन्हाळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वाणिज्य मंडळाच्या वतीने ग्राहक संरक्षण एक काळाची गरज या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला मार्गदर्शन करण्यासाठी सांगली जिल्ह्यातील पलुश महाविद्यालयाचे प्रा.एस.एम. जोशी उपस्थित होते. या कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना प्रा.एस.एम. जोशी यांनी सर्वप्रथम ग्राहक ही संकल्पना स्पष्ट केली. आपल्या मार्गदर्शनामध्ये त्यांनी ग्राहक म्हणजे कोण ते तक्रार करतांना काय काळजी घ्यावी इथपर्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. १९८६ ला लागू झालेला ग्राहक संरक्षण कायदा विस्ताराने त्यांनी स्पष्ट केला. समाजामध्ये ग्राहक म्हणून वावरत असतांना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी कोणती काळजी घ्यावी याविषयी सविस्तर असे मार्गदर्शन केले. सदर मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांमधील ग्राहक जागा झाल्याचे जाणवले. या प्रश्नोत्तरात्मक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कुमारी कोमल सकपाळ, प्रस्तावना कुमारी जानव्ही शिरगावकर व आभार प्रदर्शन संकेत चव्हाण याने केले. सदर कार्यक्रमाला पाटपन्हाळे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य श्री. प्रवीण सनये, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. सुभाष खोत, प्रा. लंकेश गजभिये व प्रा. क्रिष्णाजी शिंधे हे उपस्थित होते. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.





# जैव विविधता जोपासणे अत्यंत अनिवार्य

## प्रा. रामलिंग तोडकरी

शुक्रवार दि. १५ मार्च २०१९ रोजी पाटपन्हाळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वाणिज्य मंडळाच्या वतीने एसवायबीकॉम या वर्गाची सहल निसर्गाच्या सानिध्यात एक दिवस या कार्यक्रमाअंतर्गत निसर्ग मेळावा हा कार्यक्रम चिखली येथे लगून कुटीर या ठिकाणी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी आधुनिक शेतीचे अर्थशास्त्र समजावून घेतले. आपल्या गावात राहुनच आधुनिक प्रकारची शेती करून उत्पन्न कसे चांगले मिळवता येईल याविषयी सविस्तर मार्गदर्शन प्रा. तोडकरी यांनी केले. सदर कार्यक्रमाला पाटपन्हाळे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य देसाई प्रमोद, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. सुभाष खोत, प्रा. लंकेश गजभिये, प्रा. जाधव व प्रा. पारखे उपस्थित होते.





